# - अंतिम जाहीर नोटीस-

वाचा 1.शासन निर्णय महसूल व वनविभाग क्र. संकीर्ण03/2015/प्र.क्र24/अ-2 दि.12/05/2015

2.महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वनविभाग यांचे परिपत्रक क्र.एलक्यूएन/01/2017,प्र.क्र.12/भाग/अ-2 मंत्रालय मुंबई-4000032 दिनांक-25/01/2017

---

क्र.उ.जि./भूसंपादन-03/एसआर-02/2024

दिनांक- 27/01/2025

ज्या अर्थी, वरील वाचले मध्ये नमूद शासन निर्णय व परिपत्रकानुसार कार्यकारी अभियंता, ताकारी म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन विभाग, सांगली यांनी विस्तारीत म्हैसाळ उपसा सिंचन योजनेच्या बोगदा कामासाठी आवश्यक मौजे सलगरे ता.मिरज हद्दीमधील गट नंबर 470 मधील एकूण क्षेत्र 0.31.50 हे.आर इतके क्षेत्र खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने भूसंपादन करणेकामीचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारीसो सांगली यांचेकडे सादर केला आहे.

तसेच ज्या अर्थी, मा.जिल्हाधिकारी सांगली यांचेकडील आदेश क्र.भूसं/आरआर-858/2024, दिनांक 10/10/2024 अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी वरील वाचले मध्ये नमूद शासन निर्णय तसेच शासन परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र.03 सांगली यांना निर्देश दिले आहेत.

त्या अर्थी, उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदींनुसार उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्र.3 सांगली तथा सदस्य सचिव जिल्हास्तरीय समिती सांगली यादवारे, प्रस्तावित जमिनीचे क्षेत्र खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता, ताकारी म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन विभाग, सांगली यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे.

प्रकल्पासाठी जमिनी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने घेणेकामी जमिनीच्या मोबदल्याचा दर ठरविण्यासाठी गठित जिल्हास्तरीय समिती मार्फत भूमिसंपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 मधील कलम 26 ते 30 च्या तरतुदींनुसार तसेच सदर अधिनियमाच्या शेडयूल-1 च्या तरतुदीनुसार संबंधित जमिनीसाठी परिगणित होणा-या एकूण मोबदल्याच्या रक्कमेवर 25 टक्के रक्कम वाढीव देऊन खरेदीची रक्कम निश्चित करण्यात येईल.

याबाबतीत

1. हितसंबंधित भूधारकांनी त्यांच्या हरकती असल्यास त्या कार्यकारी अभियंता, ताकारी म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन विभाग, सांगली यांचे कार्यालयाकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून पंधरा (15) दिवसांचे आत कार्यालयीन वेळेत दाखल कराव्यात.
2. भूसंपादित करावयाची जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने घ्यावयाच्या क्षेत्राच्या आराखडयाची प्रत कार्यकारी अभियंता, ताकारी म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन विभाग, सांगली यांचे कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना व हितसंबंधित व्यक्तींना निरीक्षणासाठी उपलब्ध आहे.

खाजगी वाटाघाटीने थेट खरेदीपध्दती प्रकरण/एसआर क्र.2/2024, मौजे सलगरे, ता.मिरज जि.सांगली विस्तारीत म्हैसाळ उपसा सिंचन योजनेच्या बोगदा कामासाठी या प्रयोजनाकरीता खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने खरेदी करावयाच्या खाजगी जमिनीचा तपशिल :-

| अ. नं. | सर्वे नंबर/ गट नंबर | क्षेत्र व आकार | भूधारणा पध्दती | खाजगी वाटाघाटी दवारे खरेदी पध्दतीने घ्यावयाचे क्षेत्र | गत 30 वर्षातील 7/12 व दुय्यम निबंधक यांचेकडील गत 15 वर्षातील नोंदणीकृत दस्त इ अभिलेख तपासणी अंती ज्या सर्वे नंबर मधील ज्या कायदेशीर हितसंबंध असलेल्या व्यक्तींकडून खाजगी वाटाघाटीदवारे थेट पध्दतीने जमीन खरेदी करावयाची आहे अशा व्यक्तींची नावे |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 470 | 4.39 हे. आर (आकार-0.94 पै) | भोगवटादार वर्ग-1 | 0.31.50 आर | 1.श्रीकांत पिराजी वाघमारे<br>2.प्रकाश पिराजी वाघमारे<br>3.प्रकाश पिराजी वाघमारे, राजाक्का यमनाप्पा रणखांबे, श्रीकांत पिराजी वाघमारे (सामाईक क्षेत्र)<br>4.वसंत रामू वाघमारे, तुकाराम रामू वाघमारे, शिशुपाल रामू वाघमारे, सुरेश रामू वाघमारे, युवराज रामू वाघमारे, फुलाबाई भिमराव कांबळे, प्रभावती कांताप्पा कांबळे, नलीता जयपाल खांडेकर, कलावती उत्तम कांबळे, कृष्णाबाई रामू वाघमारे (सामाईक क्षेत्र)<br>इतर अधिकार-इतर-बंडिंग तारण र.रु.182.71/- (1)<br>वारस-बि.क.वारस-(918) सौ.राजाक्का यमनाप्पा रणखांबे (918)<br>जुने फेरफार - 7019 |

**ठिकाण- सांगली**
**दिनांक - 27/01/2025**

**(पी.जी.देशमुख)**
**पॅनेल ॲडव्होकेट**
**(महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ)**

**(रोहित कोरे)**
**कार्यकारी अभियंता,**
**ताकारी म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन विभाग**

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र. 3 सत्यमेव जयते सांगली

**(सविता लष्करे)**
**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र.03**
**तथा सदस्य सचिव, जिल्हास्तरीय सांगली समिती,**
**सांगली जिल्हा**

Scanned with OKEN Scanner